
# शेतीमालाचा हमीभाव म्हणजे एक मृगजळच...



नित्यनियमाप्रमाणे देवदर्शन आटोपून संपत पारावर बसला होता. तेवढ्यात गणपतही देवदर्शन घेऊन संपतच्या मांडीला मांडी देऊन बसत म्हणाला, ''संपा, तू कालची बातमी ऐकली काय? यावर्षी आपल्या पीक उत्पादनाचे हमीभाव मोठ्या प्रमाणात वाढविले आहेत, असे सांगितले. आपण पीक उत्पादनासाठी जेवढा खर्च करतो त्याच्या दीडपट शेतमीलाला भाव दिल्याचे काल सांगत होते. फार बरं वाटलं. काल छान झोप आली. आता आपल्या खिशात बऱ्यापैकी पैसा येईल बघ संपा!''

गणपतचा चेहरा आज फारच आनंदी दिसत होता. संपतने कालची बातमी सविस्तर वाचली होती. त्यातले बारकावे अभ्यासले होते. त्यामुळे त्याला या बातमीने विशेष आनंद झाला नाही. परंतु गणपतच्या आनंदामध्ये विरजण नको म्हणून संपतनेही काहीसा सकारात्मक सूर लावून होकार देत म्हटले, ''हो रं गंपा, यावर्षी सरकारने अनेक पिकांचे हमीभाव चांगले वाढवून दिले. सोयाबीन ३५० रुपये, कापूस ३५४ रुपये, भात १०० रुपये, ज्वारी २३२ रुपये, बाजरी १०० रुपये, मका ९२ रुपये, तूर ३०० रुपये, मूग ४८० रुपये, उडीद ३०० रुपये, भुईमूग ३८५ रुपये, सूर्यफूल ३५० रुपये याप्रमाणे हमीभावात वाढ केली. अर्थात टक्केवारीमध्ये विचार केला तर यावर्षी हमीभावात ५ ते ६ टक्के वाढ झाली असे म्हणावे लागेल. आता दुसऱ्या बाजूने आपण विचार केला पाहिजे की यावर्षी मजुरीमध्ये किती वाढ झाली, शेतीच्या मशागतीचा खर्च किती टक्के वाढला, डिझेल- पेट्रोल कितीने वाढले, खतांच्या किंमती किती वाढल्या, कीटकनाशके- बियाणे यांच्या किंमती वाढल्या असतील तरी किती प्रमाणात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे महागाई किती रुपयांनी वाढली? महागाई जेवढी वाढली त्या प्रमाणात सरकारी असो की खासगी नोकरदार यांचे पगार त्या प्रमाणात वाढले की नाही याची देखील माहिती घ्यावी लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्या शेतात काम करणाऱ्या मजुरांना दरवर्षी १०-१२ टक्के पगारवाढ देतोच! उक्ते काम असेल तरी दरवर्षी त्यामध्ये कमीतकमी १० टक्के वाढ होते.''

मध्येच गणपत संपतला थांबवत म्हणाला, ''मला तर तू काय बोलतो तेच कळेना. माझा तू सारा मूड घालवला बघ. तुला काय म्हणायचे ते स्पष्ट बोल. उगाच इकडचे- तिकडचे बोलतोय! शेतीमालाचे हमीभाव यावर्षी चांगले वाढविले हे तुला मान्य आहे

की नाही यावर बोल.''

संपत हसून म्हणाला, ''अरं गंपा, शेतीमालाचे हमीभाव वाढविल्यानंतर तुला आनंद झाला आहे, त्यात विरजण नको पडायला म्हणून मी असं बोलत होतो. आता स्पष्टच सांगतो, शेतीमालाचे हमीभाव वाढले आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दीडपट वाढ होणार हे फक्त मृगजळच आहे. आतापर्यंत प्रत्येक सरकारने शेतकऱ्यांना वेठीलाच धरलेले आहे. मोदी सरकार आल्यानंतर त्यांनी शेतीमालाला दीडपट भाव देऊ असे सांगितले होते. काय झालं मागील ८-९ वर्षांत? मागच्या सरकारने केले तेच हे सरकार करत आहे. खरं तर पीक उत्पादन खर्च कसा काढला जातो हे मला आजपर्यंत कळाले नाही. एक तर पिकाचा उत्पादन खर्च कमी दाखवायचा आणि त्यानुसार दीडपट किंवा त्यापेक्षा जास्त भाव दिला असे कागदावर दाखवायचे. हे सर्व कागदी घोडे ऑफिसमध्ये बसवून नाचवणं त्यांना जमतं रे. मी म्हणतो, ज्यांनी पिकाचा उत्पादन खर्च जेवढा काढला तेवढाच खर्च ते ज्या कृषी- संस्थेमध्ये काम करतात तेथील पिकांना येतो काय? किंवा ज्यांनी ही उत्पादन खर्चाची आकडेवारी काढली तोच खर्चाचा आकडा त्यांच्या घरच्या शेतीमध्ये येतो काय? या साऱ्याचा कमीतकमी विचार तरी त्यांनी करावा, असे मला वाटते. जर शेतीमध्ये दीडपट नफा झाला असता तर शेती कशी काय तोट्यात गेली असती? शेतकऱ्यांनी आत्महत्या कशाला केल्या असत्या? म्हणून म्हणतो गंपा, शेतीमालाचे हमीभाव हे फक्त मृगजळ आहे बघ. लांबून छान दिसते परंतु जवळ गेले की काहीच नसते. आपल्याला माहीत आहे की, आज आपण जो खर्च करतो त्याची उत्पादनाशी तोंड मिळवणी करतानाच नाकीनऊ येतात. कधीतरी चांगला दर मिळाला तर फायदा होतो नाही तर नुकसान होणार हे गृहीतच धरलेले असते. शेतकऱ्यांनी यावर्षी तेलबियांना थोडासा हमीभाव वाढवून दिला आहे. खरं तर आपल्याला खाद्यतेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी तेलबियांचे दर जास्त प्रमाणात वाढवून दिले तर शेतकरी या पिकांकडे वळतील. आज आपण एक लाख कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करतो. हाच पैसा देशातील शेतकऱ्यांच्या खिशात गेला तर काय हरकत आहे? परंतु अगदी पायाजवळ पाहूनच अनेक निर्णय घेतले जातात. पुढील ५-१० वर्षांचा विचार करून ज्या शेतीमालाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे- त्यानुसार त्या शेतीमालाचा हमीभाव वाढवून देणे गरजेचे आहे.''

संपत बोलत असताना गणपतचा आनंदी चेहरा आता हळूहळू काळवंडू लागला होता. गणपतकडे बघून संपत बोलायचा थांबला. काही वेळ शांतता पसरली. गणपतनेच पुन्हा सुरवात केली.

''ठीक आहे रे संपा, आपल्याला काय हे नवीन आहे काय? आपल्या पाचवीलाच पुजलले आहे हे. ज्यांच्या कुटुंबात कोणी नोकरीला आहे किंवा त्यांचा इतर काहीतरी व्यवसाय आहे अशीच कुटुंबं पुढे गेली. फक्त शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांची काही फार मोठी प्रगती झाली नाही. काही शेतकऱ्यांना एखाद्या पिकात लॉटरी लागली तर त्यांचा काही काळापुरता विकास झाला! अशा घटना अगदी किरकोळ आहेत. सरकारने जी काही १००- २०० रुपये हमीभावात वाढ केली त्यात समाधान मानायचे. आता सरकारने हमीभाव ठरवून दिला. पण हा हमीभाव नेमका कशासाठी ठरविला जातो हे गणित मला आतापर्यंत समजले नाही बघ. अनेकदा हमीभाव असतो त्यापेक्षा कमी दराने आपण व्यापाऱ्याला आपला शेतीमाल विकतो. मग या हमीभावाचा काय फायदा?''

यावर हसून संपत म्हणाला, ''अरं हे तर आणखी फार मोठं नाटक आहे सरकारचं. खरं तर आपल्या देशात हमीभावाने दोनच गोष्टी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जातात. त्यामध्ये भात आणि गहू असतो. तांदळाची खरेदी पंजाब- हरियाणा तसेच दक्षिण भारतातून केली जाते तर गव्हाची खरेदी उत्तर भारतात होते. तिसरा शेतीमाल सरकार काही प्रमाणात खरेदी करते तो म्हणजे कापूस. या व्यतिरिक्त इतरही शेतीमाल खरेदी केला जातो परंतु अत्यंत कमी प्रमाणात. म्हणून ज्यावेळी शेतीमालाचे उत्पादन वाढते त्यावेळी त्या शेतीमालाचे भाव पडतात. एकूण उत्पादनाच्या १० टक्के शेतीमाल सरकारने हमीभावाने

खरेदी करावा- जेणेकरून मार्केटमधील दर पडण्याचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा असते. परंतु याप्रमाणे सरकार खरेदी करत नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दराने शेतीमाल विकून पैसा करावा लागतो. म्हणून हे जे काय हमीभावाचे नाटक आहे ते अनेक जण बघतच नाहीत; कारण नाटक बघून फक्त करमणूक होते, पोट भरत नाही! या नाटकामुळे नाटकात काम करणाऱ्यांचा संसार उभा राहतो परंतु नाटक बघणाऱ्यांचा संसार यातून थोडाच उभा राहणार?''

खरं तर हे वाक्य बोलत असताना संपतचा चेहरा लाल झाला होता. परंतु मनातल्या मनात संताप गिळत गणपतच्या मांडीवर हात ठेवत म्हणाला, ''अरे गंपा, हे चालायचंच.''

गणपतने विषय सावरण्याचा प्रयत्न केला व तो म्हणाला, ''कारं संपा, आपण बघतो की जगामध्ये शेतीमालाचा तुटवडा आहे. आपले प्रधानमंत्री म्हणतात, आपण जगाचा पोशिंदा होऊ शकतो. आपला शेतकरी सर्व जगाला अन्नधान्य पुरवठा करू शकतो. एकीकडे ज्याला जगाचा पोशिंदा म्हटलं जातं तोच उपाशी राहण्याची वेळ आली. त्याचा व्यवसाय तोट्यात जात आहे. मग तो शेतकरी जगाचा पोशिंदा कसा होऊ शकतो?''

संपत हसून म्हणाला, ''आपल्या देशातील शेतकऱ्यांची तेवढी क्षमता आहे. आज आपण शेतीचे कितीही उत्पादन वाढवू शकतो. पण त्याला हमी पाहिजे. शेतीमालाला हमीभाव जाहीर केल्यानंतर त्याची त्याच दराने खरेदी झाली पाहिजे. यासाठी कठोर कायदे आणले पाहिजेत. हा कायदा व्यापाऱ्यांबरोबर सरकारलाही लागू झाला पाहिजे. आयात- निर्यातीत धरसोडीचे धोरण बंद करून दूरदृष्टीचे धोरण आणणे गरजेचे आहे. या धोरणामुळे जागतिक पातळीवर आपल्या शेतीमालाची नाचक्की होते. शेती उत्पादन काढल्यापासून ते ग्राहकांच्या ताटात जाईपर्यंत ३० ते ४० टक्के शेतीमालाचे नुकसान होते. कारण यासाठी योग्य प्रकारच्या पायाभूत सोयी-सुविधा उलब्ध नाहीत. अशा अनेक गोष्टी आहेत बघ गंपा. परंतु खरंच या सर्व गोष्टी बदलून शेतकरी समृद्ध झाला पाहिजे ही मानसिकता आणि इच्छाशक्ती या राजकारणी- धोरणकर्त्यांची असली पाहिजे. ही इच्छाशक्ती ज्यावेळी या सर्वांमध्ये निर्माण होईल त्यावेळी शेती व्यवसाय देशात श्रेष्ठ होईल आणि तेव्हाच आपण जगाचा पोशिंदा होऊ. चल उठ, जगाच्या पोशिंद्यापेक्षा आपल्या घराच्या पोशिंद्याला काहीतरी काम करावं लागेल. चहा घेऊ आणि निघू आपापल्या शेतातल्या कामाला.''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**